# ५. वाहनांचे प्रकार व राज्यांचे संकेत

**उद्‌दिष्टे**

(१) वाहनांच्या प्रकारांची ओळख होणे.

(२) वाहनांची नोंदणी (Registration) म्हणजे काय ? त्याची आवश्यकता समजणे.

(३) वाहनांच्या नंबर प्लेटवरून प्रकार समजणे. (वैयक्तिक / व्यावसायिक वापर)

(४) वाहनांच्या प्रकारानुसार मालवाहतूक, प्रवासी, खाजगी असे वाहनांचे प्रकार समजणे.

(५) वाहनांच्या सांकेतिक शब्दांवरून राज्य, जिल्हा समजणे.

## वाहनांचे वेगवेगळे प्रकार

१) **जड मोटारगाडी (Heavy Motor Vehicles):** ज्या मोटारगाडीचे वजन रिकामी गाडी व प्रवासी / मालाच्या वजनासहित १२ टनांपेक्षा जास्त असते.

२) **मध्यम मोटारगाडी (Medium Motor Vehicle):** जिचे वजन ७.५ टनांहून अधिक, परंतु १२ टनांपेक्षा कमी असते.

३) **हलकी मोटारगाडी (Light Motor Vehicle):** जिचे वजन ७.५ टनांपर्यंत असते.

४) **मोटारटॅक्सी (Motor Cab):** अशी मोटारगाडी जी ड्रायव्हर व्यतिरिक्त जास्तीतजास्त सहा प्रवासी घेऊन जाते.

५) **मोटारसायकल (Motor Cycle):** २५ सी.सी. पेक्षा जास्त क्षमतेचे दुचाकी वाहन.

६) **सार्वजनिक सेवावाहन (Public Service Vehicle):** प्रवाशांची भाडेतत्वावर ने-आण करणारे वाहन.

७) **ओमनी बस (Omni Bus):** भाडे तत्त्वावर व वाहतुकीसाठी वापरली जाणारी आणि सहापेक्षा जास्त प्रवासी घेऊन जाणारी बस, मॅक्सी कॅब या प्रकारातील सर्व बसेस या प्रकारात येतात.

८) **परिवहन वाहन (Transport Vehicle):** कार, मोटारसायकल आणि काही प्रकारच्या वाहनांव्यतिरिक्त सर्व गाड्या.

९) **मिनी बस (Maxi Cab):** ज्या गाडीमधून ७ ते १२ प्रवासी वाहून नेले जातात, अशी बस.

१०) **इतर वाहने (Other Vehicles):**

**अ) प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची नोंदणी एकूण २४ प्रकारांमध्ये केली जाते. ती पुढीलप्रमाणे,**



१. प्रवासी अथवा सामान वाहतुकीसाठी कारसह मोटारसायकल.

२. सामान वाहतुकीसाठी ट्रेलरसह मोटारसायकल.

३. प्रवासी वाहतुकीसाठी मोटारसायकल रिक्षा.

४. प्रवासी वाहतुकीसाठी टॅक्सी व आरामदायी टॅक्सी.

५. मालवाहतुकीसाठी मालमोटारी/टँकर, पार्सल वाहतूक करणारी वाहने.

६. ट्रेलर्स

७. मॅक्सी कॅब

८. स्टेज कॅरिअर्स – टप्पे वाहतूक करणारी शहरातील बस किंवा एस.टी. बस या प्रकारात मोडते.

९. कंत्राटी पद्धतीने केल्या जाणाऱ्या माल व प्रवासी वाहतुकीसाठी वाहने.

१०. फिरता दवाखाना व फिरते ग्रंथालय यासाठी वापरली जाणारी.

११. माल व प्रवासी वाहतुकीसाठी तीन चाकी वाहने.

१२. खाजगी सेवा देणारी वाहने.

१३. शैक्षणिक संस्थांच्या बसेस.

१४. रुग्णवाहिका.

१५. खाद्य पदार्थांची विक्री करणारी फिरती वाहने.

१६. पैशांची ने-आण करण्यासाठी वापरली जाणारी वाहने.

१७. आठ टायर्सपेक्षा जास्त टायर्स असणारी वाहने. (कंटेनर)

१८. कॅम्पर व्हॅन्स/ट्रेलर्स- घराप्रमाणे सर्व सुखसोयींनी युक्त फिरते वाहन.

१९. पशु-पक्ष्यांसाठी रुग्णवाहिका.

२०. शववाहिनी.

२१. बंद पडलेल्या वाहनांच्या दुरुस्तीसाठी फिरती वाहने.

२२. अग्निशामक वाहने.

२३. ओमनी बस – ७ ते १२ प्रवासी वाहून नेणारी वाहने.

२४. डंपर/एक्सकॅव्हेटर, क्रेन



ब) प्रवासी किंवा मालवाहतुकीसाठी न वापरल्या जाणाऱ्या वाहनांची नोंदणी प्रादेशिक परिवहन कार्यालयात १५ प्रकारांमध्ये केली जाते. ती पुढीलप्रमाणे






१. व्यक्तिगत वापरासाठी मोटारसायकल.

२. व्यक्तिगत सामान नेण्यासाठी ट्रेलरसह मोटारसायकल.

३. मोपेड आणि मोटराइज्ड सायकल (३५ सीसीपेक्षा अधिक)

४. इनव्हॅलिड कॅरेज.

५. व्यक्तिगत वापरासाठी तीनचाकी वाहन.

६. मोटो कार

७. फोर्क लिफ्ट

८. विद्युत जनित्र, कॉम्प्रेसर यांसारखी सामग्री बसवलेली वाहने.

९. क्रेन बसवलेली वाहने.

१०. ट्रॅक्टर

११. व्यक्तिगत सामान वाहतुकीसाठीचे ट्रेलर.

१२. बंद पडलेले वाहन ओढून नेण्यासाठी तसेच विजेच्या तारांची दुरुस्ती किंवा झाडांच्या फांद्यांचे अडथळे दूर करण्यासाठी वापरात येणारी वाहने.

१३. ब्रेकडाऊन झालेल्या मालमोटारींच्या रिकव्हरीसाठी वाहन.

१४. खाजगी वापरासाठी ओमनी बस.

१५. खाजगी वापरासाठी घराप्रमाणे सर्व सुविधांनी युक्त असलेले वाहन इ.



## ५.२ सर्व राज्यांतील आर. टी. ओ. (R.T.O) रजिस्ट्रेशन संकेताक्षरे.

भारतातील निरनिराळी राज्ये व केंद्रशासित प्रदेश यांमधील वाहनांची नोंदणी : त्या त्या राज्यांच्या/ केंद्रशासित प्रदेशांच्या नावांनुसार नोंदणीच्या वेळी वापरण्यात येणारी इंग्रजी संकेताक्षरे व अंक याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे,

| अ. क्र | राज्य/केंद्रशासित प्रदेशाचे नाव | इंग्रजीतील सांकेतिक शब्द |
|---|---|---|
| (१) | अंदमान आणि निकोबार | AN |
| (२) | आंध्र प्रदेश | AP |
| (३) | अरुणाचल प्रदेश | AR |
| (४) | आसाम | AS |
| (५) | बिहार | BR |
| (६) | चंदीगड | CH |
| (७) | दादरा आणि नगर हवेली | DN |
| (८) | दमण आणि दीव | DD |
| (९) | दिल्ली | DL |
| (१०) | गोवा | GA |
| (११) | गुजरात | GJ |
| (१२) | हरियाणा | HR |
| (१३) | हिमाचल प्रदेश | HP |
| (१४) | जम्मू आणि काश्मीर | JK |
| (१५) | कर्नाटक | KA |
| (१६) | केरळ | KL |
| (१७) | लक्षद्वीप | LD |
| (१८) | मध्यप्रदेश | MP |
| (१९) | महाराष्ट्र | MH |
| (२०) | मणिपूर | MN |
| (२१) | मेघालय | ML |
| (२२) | मिझोराम | MZ |
| (२३) | नागालँड | NL |
| (२४) | ओरीसा | OR / OD |
| (२५) | पाँडिचेरी | PY |
| (२६) | राजस्थान | RJ |
| (२७) | सिक्कीम | SK |
| (२८) | तामिळनाडू | TN |
| (२९) | त्रिपुरा | TR |
| (३०) | उत्तर प्रदेश | UP |
| (३१) | पश्चिम बंगाल | WB |
| (३२) | झारखंड | JH |
| (३३) | छत्तीसगड | CG |
| (३४) | पंजाब | PB |
| (३५) | उत्तराखंड | UK |
| (३६) | तेलंगना | TS |
| (३७) | लेह लडाख | LL / LA |

### उपक्रम

वर्गातील विद्यार्थ्यांचे गट तयार करा व त्यांना राज्यांचे सांकेतिक क्रमांक व इंग्रजी संकेताक्षरे ओळखण्याचे खेळ घ्या.

### कृती

१. चित्रावरून वाहनांचे प्रकार ओळखणे.

प्रकल्प: विविध प्रकारच्या वाहनांची चित्रे संकलित करणे. किंवा

जवळच्या पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलीस वाहतूक व्यवस्था समजावून घ्या.

## महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे व शहरांचे आर.टी.ओ कार्यालय सांकेतिक क्रमांक.

| अ. क्र | महाराष्ट्रातील जिल्ह्याचे वा शहराचे नाव | सांकेतिक क्रमांक |
|---|---|---|
| (१) | मुंबई (मध्य) | 01 |
| (२) | मुंबई (पश्चिम) | 02 |
| (३) | मुंबई (पूर्व) | 03 |
| (४) | ठाणे | 04 |
| (५) | कल्याण | 05 |
| (६) | पेण (रायगड) | 06 |
| (७) | सिंधुदुर्ग | 07 |
| (८) | रत्नागिरी | 08 |
| (९) | कोल्हापूर | 09 |
| (१०) | सांगली | 10 |
| (११) | सातारा | 11 |
| (१२) | पुणे | 12 |
| (१३) | सोलापूर | 13 |
| (१४) | पिंपरी-चिंचवड, पुणे | 14 |
| (१५) | नाशिक | 15 |
| (१६) | अहमदनगर | 16 |
| (१७) | श्रीरामपूर (अहमदनगर) | 17 |
| (१८) | धुळे | 18 |
| (१९) | जळगाव | 19 |
| (२०) | औरंगाबाद | 20 |
| (२१) | जालना | 21 |
| (२२) | परभणी | 22 |
| (२३) | बीड | 23 |
| (२४) | लातूर | 24 |
| (२५) | उस्मानाबाद | 25 |
| (२६) | नांदेड | 26 |
| (२७) | अमरावती | 27 |
| (२८) | बुलढाणा | 28 |
| (२९) | यवतमाळ | 29 |
| (३०) | अकोला | 30 |

| अ. क्र | महाराष्ट्रातील जिल्ह्याचे वा शहराचे नाव | सांकेतिक क्रमांक |
|---|---|---|
| (३१) | नागपूर | 31 |
| (३२) | वर्धा | 32 |
| (३३) | गडचिरोली | 33 |
| (३४) | चंद्रपूर | 34 |
| (३५) | गोंदिया | 35 |
| (३६) | भंडारा | 36 |
| (३७) | वाशिम | 37 |
| (३८) | हिंगोली | 38 |
| (३९) | नंदुरबार | 39 |
| (४०) | नागपूर (ग्रामीण) | 40 |
| (४१) | मालेगाव (नाशिक) | 41 |
| (४२) | बारामती (पुणे) | 42 |
| (४३) | वाशी (नवी मुंबई) | 43 |
| (४४) | अंबेजोगाई (बीड) | 44 |
| (४५) | अकलुज (सोलपूर) | 45 |
| (४६) | पनवेल (रायगड) | 46 |
| (४७) | बोरीवली (मुंबई) | 47 |
| (४८) | वसई-विरार (ठाणे) | 48 |
| (४९) | नागपूर (पूर्व) | 49 |
| (५०) | कराड (सातारा ग्रामीण) | 50 |

### उपक्रम

www.transport.maharashtra.gov.in

या संकेतस्थळाला भेट देऊन रस्तासुरक्षा विषयी अधिक आणि अद्ययावत माहिती मिळवा.

### वाहन नोंदणी विभागात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

१. वाहनांची नोंदणी (Online) संगणकीय पद्धतीने करणे.

२. वाहन चालन परवाना (Driving license) इतर परवाने स्मार्टकार्ड स्वरूपात करणे.

३. ई-चलनाच्या माध्यमातून R.T.O. कार्यालयाचे आर्थिक व्यवहार होणे/केले जाणे.

४. कार्यालयाचे कामकाज संगणकीकृत पद्धतीने केले जाणे.

५. अधिक माहितीसाठी खालील संकेतस्थळांना भेट द्या.

१. https//vahan.nic.in, २. www.cirtindia.com

## मूल्यमापन

| निकष | उत्तम (खूप चांगले) | योग्य (समाधानकारक) | अयोग्य (असमाधानकारक) | गुण |
|---|---|---|---|---|
| वाहनांचे विविध प्रकार ओळखणे | वाहनांचे विविध प्रकार उत्तम प्रकारे ओळखून यादी तयार करतो. | काही वाहनांचे प्रकार ओळखून यादी तयार करतो. | वाहनांचे प्रकार ओळखताना गोंधळ करतो. | |
| राज्यांतील R.T.O. संकेताक्षरांची यादी तयार करणे. | राज्यातील R.T.O. संकेताक्षरांची यादी उत्तम प्रकारे तयार करतो. | राज्यातील R.T.O. संकेताक्षरांची यादी उलट सुलट करतो. | राज्यातील R.T.O. संकेताक्षरांची यादी तयार करताना गोंधळ करतो. | |
| वाहनांवरील नंबर प्लेट पाहून वाहनांची ओळख करणे. | वाहनांवरील नंबर प्लेट पाहून हे वाहन कोणत्या राज्यातील आहे हे उत्तम प्रकारे ओळखतो. | वाहनांवरील नंबर प्लेट पाहून हे वाहन कोणत्या राज्यातील हे काही प्रमाणात ओळखतो. | वाहनांवरील नंबर प्लेट पाहून हे वाहन कोणत्या राज्यातील आहे हे ओळखण्याचा प्रयत्न करताना गोंधळ करतो. | |

***

## माझा अभ्यास

१. वाहनांचे वेगवेगळे प्रकार लिहा.

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

२. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून कोणकोणत्या प्रकारच्या वाहनांची नोंदणी केली जाते ते प्रकार लिहा.

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

३. भारतातील निरनिराळी राज्ये व केंद्रशासित प्रदेश यामधील वाहनांची नोंदणी प्रदेशाच्या नावानुसार, नोंदणीच्या वेळी वापरण्यात येणारी इंग्रजी संकेतानुसार प्रदेशाचे नाव व इंग्रजी सांकेतिक शब्द लिहा.

४. वाहनाच्या नंबर प्लेटवरील संकेत क्रमांकावरून महाराष्ट्रातील जिल्ह्याचे शहराचे नाव व क्रमांक लिहा.